मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

मप्र

# हितगुज

अंक ५९ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● सप्टेंबर २००४

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## मराठे प्रतिष्ठानची गरुड भरारी
## संकेतस्थळ www.marathepratishthan.org

**- माधव वासुदेव** (पृ.३८६), पुणे

मराठे प्रतिष्ठानच्या सदस्यांना, विशेषतः युवकांना, जगातील सर्व ज्ञानकक्षा उपलब्ध व्हाव्या म्हणून मराठे प्रतिष्ठान इंटरनेट द्वारे जगातील सर्व मराठे परिवारापर्यंत आता पोहोचू शकते. परस्परांशी संबंध वाढावेत. आपले विचार व माहितीचे आदान-प्रदान सहजपणे व्हावे या उद्देशाने मराठे प्रतिष्ठानने जागतिक स्तरावरील हे आपले संकेतस्थळ (website - www.marathepratishthan.org) सुरू केले आहे.

या संकेतस्थळाचा शुभारंभ रक्षाबंधनाच्या शुभमुहूर्तावर (२९-८-२००४) करण्यात आला असून यामुळे मराठे परिवारातील सर्वांचे भावबंध अधिक दृढ होतील.

आपली संस्कृती, परंपरा व भाषा न सोडता हे तंत्रज्ञान साध्य करण्याचा मराठे प्रतिष्ठानचा प्रयत्न आहे. म्हणूनच आपली घराणी, कुलदेवता, कुलाचार, प्रतिष्ठानचे कार्य व कार्यक्रम इत्यादी सर्व माहिती मुद्दाम आपल्या आवडत्या गोड मराठी भाषेतूनच देण्यात आली आहे.

आपल्या या संकेतस्थळाला आपण अवश्य भेट द्या. **आपल्या प्रतिक्रिया व सूचनांचे आम्ही स्वागत करू.**

आपल्या या संकेतस्थळावर आपण सर्व तऱ्हेची माहिती पाठवावी, जी मराठे परिवारातील सर्वांना समजावी असे आपणांस वाटते. तसेच ज्या माहितीमुळे मराठे परिवारातील सदस्यांचा फायदा होईल अशी सर्व माहिती संकलित करून ती आपल्या संकेतस्थळावर देण्यात येईल. आपली माहिती व सूचना खालील इमेलवर पाठवावी ही विनंती.

१) suchana@marathepratishthan.org या इमेलवर आपण आपल्या प्रतिष्ठान संबंधित सूचना, प्रतिष्ठानचे कार्यक्रम/फोटो पाठवावे.

२) sanman@marathepratishthan.org या इमेलवर आपल्या परिवारातील कोणाही व्यक्तीने केलेले विशेष कार्य, मिळविलेले सन्मान तसेच विद्यार्थी यांनी मिळविलेल्या यशाची माहिती कळवावी.

३) kulvruttant@marathepratishthan.org या इमेलवर आपल्या घराण्याची अद्ययावत माहिती कळवावी.

४) vivaha@marathepratishthan.org या इमेलवर विवाहसहाय्य संबंधी माहिती द्यावी.

पुणे शाखेच्या वतीने हे संकेतस्थळ विकसित करण्यात श्री. उज्वल मधुकर मराठे यांचा फार मोठा वाटा आहे. आपणांस आपले हे www.marathepratishthan.org संकेतस्थळ नक्कीच आवडेल व उपयुक्त ठरेल.

***

### एकमेकां साह्य करू

जो विद्यार्थी वैद्यकीय किंवा इंजिनीयरिंग शाखेमध्ये शिक्षणासाठी प्रवेश घेऊ इच्छित आहे. परंतु जो आर्थिक परिस्थितीमुळे प्रवेश घेऊ शकत नाही अशा कुलोत्पन्न विद्यार्थ्यास आम्ही शिक्षणासाठी आर्थिक मदत करू इच्छित आहो. सदर विद्यार्थ्याने आमच्याशी घरगुती संबंध ठेवून आमच्याशी घरोबा राखणे आवश्यक आहे. आमचा पत्ता - **अशोक गोविंद मराठे** (पृ.२१८), २९ डी, कामगार नगर, स. गो. बर्वे मार्ग, कुर्ला (पूर्व), मुंबई - ४०० ०२४.
फोन : २५२३०३३२

मराठे प्रतिष्ठान

पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)

मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : ४३०२४५३.

# प्रतिष्ठान वृत्त

## कार्यकारी मंडळ सभा

प्रत्येक महिन्याच्या **दुसऱ्या** शनिवारी कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी सायंकाळी ५ वाजता कुलबांधव कार्यकारी मंडळाच्या भेटीसाठी येऊ शकतात.

मागील तिमाहीत जून १९, जुलै १८ आणि ऑगस्ट १४ व २८ रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या. १९ जून वगळता अन्य तीनहि सभा मोहन सदाशिव यांच्या अध्यक्षतेखाली झाल्या. १८ जुलैची सभा श्री. रमाकांत विद्वांस यांच्या प्रेमपूर्वक आग्रहानुसार त्यांच्या खंडाळा येथील बंगल्यात झाली. पत्रव्यवहार, जमाखर्च इ. नित्याच्या कामकाजाव्यतिरिक्त या सभांत पुढीलप्रमाणे महत्त्वाचे कामकाज झाले.

१९ जूनच्या सभेला दादर, मुंबई येथील सभासद प्रभाकर गणेश (पृ.६१) हे मुद्दाम उपस्थित होते. त्यांनी १०वीत व्होकेशनल विषयांत सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी गणेश पारितोषिक प्रायोजित केलेले आहे. (रु. ५००० देणगी देऊन). मात्र कमी झालेले व्याजदर लक्षात घेता त्यांनी यासाठी आणखी रु. १०,००० ची देणगी या सभेत दिली. सभेने या दातृत्वाबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

गेल्या २/३ वर्षात या पारितोषिकांसाठी पात्र कुलबांधवांकडून अर्जच येत नसल्यामुळे पात्रतेच्या निकषांत त्यांनी बदल केला. ''१०वीला तांत्रिक विषय नसले तरी १०वी नंतर मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक, कंप्युटर इंजिनियरिंग यांसारख्या अभियांत्रिकीच्या कोणत्याहि विद्याशाखेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी १०वी च्या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यास/विद्यार्थिनीस गणेश पारितोषिक देण्यांत यावे; मात्र १०वीला अभियांत्रिकी विषय घेणाऱ्यास अग्रक्रम देण्यांत यावा.'' अशी इच्छा त्यांनी प्रदर्शित केली. ती मान्य करण्यात आली.

**जुलै १८च्या सभेंत** इंदौर येथील कुलबांधव श्रीकांत मराठे यांना बायपास शस्त्रक्रियेसाठी झालेल्या खर्चापोटी विशिष्ट हेतु निधीमधून रु. ५००० मदत त्वरित द्यावी असे ठरविण्यांत आले. सौ. मंगला प्रवीण मराठे, गोरेगांव, यांनी मराठे प्रतिष्ठानच्या कुटुंबसल्ला केंद्राबाबतचा पाठवलेला आराखडा सभासदांच्या प्रतिक्रिया/सूचनांसाठी हितगुजमध्ये प्रसिद्ध करावा, तसेच विवाह सहाय्य मध्ये माहिती प्रसिद्धी संदर्भात प्रत्येक स्थळाकरिता रु. १०० शुल्क घेण्यांत यावे असेहि या सभेत ठरविण्यात आले.

**१४ ऑगस्टच्या सभेत** वार्षिक अहवाल मंजूर करण्यांत आला. तसेच वाढलेल्या टपालखर्चाच्या संदर्भात असे ठरविण्यात आले की मराठे प्रतिष्ठानच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, वार्षिक अहवाल व हिशेबपत्रके स्वतंत्रपणे छापून न पाठवता हितगुजमध्येच छापावी

**२८ ऑगस्टच्या सभेत** लेखापरीक्षकांकडे पाठवण्यासाठी हिशेबपत्रके संमत करण्यात आली. तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेची तारीख, वेळ व स्थळ निश्चित करण्यात आले. (पहा पृ.५)

## वैद्यकीय मदत निधीला देणगी

मराठे प्रतिष्ठानचे **पूर्वकार्यवाह कै. वामन गणेश (पृ.१७) यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त** (३० जून) त्यांच्या पत्नी सुमतीबाई यांनी **रु. ५००० देणगी** दिली असून या रकमेच्या व्याजातून गरजू रुग्णाला मदत करण्यात यावी अशी इच्छा प्रदर्शित केली. **१९ जूनच्या** कार्यकारी मंडळाच्या **सभेत** या देणगीचा कृतज्ञतापूर्वक स्वीकार करण्यात आला.

## हितगुज

वाढलेला छपाई व टपालखर्च आणि व्याजदरांतील घट लक्षांत घेता पृष्ठसंख्या मर्यादित करण्याऐवजी स्थायी स्वरूपाच्या जाहिरातीसाठी अगर काही पाने वा प्रतिष्ठान वृत्त, सभासद वृत्त या विभागांच्या प्रायोजकत्वासाठी कुलबांधवांना आवाहन करावे असे **२८ ऑगस्टच्या सभेंत** ठरविण्यात आले.

***

---

# जाहिरातींसाठी आवाहन

मार्च १९९४ मध्ये जाहीर केलेल्या हितगुज स्वयंपूर्ण योजनेप्रमाणे रु. २०० तहहयात वर्गणीच्या व्याजातून किमान ८ पानांचे वर्षात ४ अंक देण्याचे आश्वासन देण्यात आले होते.

वर्गणी आणि हितगुज देणग्यांच्या व्याजातून सध्या १६ पानांचे अंक देण्यांत येतात. वाढलेला खर्च आणि घटलेले व्याज लक्षांत घेता यापुढे हे शक्य होणार नाही. यासाठी **कुलबांधवांना हे सहकार्याचे आवाहन -**

१. अभिनंदन, अभीष्टचिंतन, पुण्यस्मरण या स्वरूपाच्या अगर आपल्या उद्योग-व्यवसायाच्या **जाहिराती कायमस्वरूपी द्याव्या.** यासाठींचे दर आहेत - पाव पान रु. ६००, अर्धे पान रु. १२००, पूर्ण पान रु. २४०० (नवनिर्वाचित **कोषाध्यक्ष प्रभाकर दामोदर** यांनी मार्च २००४ अंकापासून **मातोश्री पुण्यस्मरण जाहिरात देऊन या योजनेचा शुभारंभ** केला आहे.)

२. अपत्यप्राप्ती, बारसे, लग्न-मुंज, वाढदिवस अशा निमित्ताने **हितगुज निधीसाठी** अगर जमेल तेव्हा आपल्या इच्छेनुरूप **टपाल खर्चासाठी छोटी-मोठी देणगी द्यावी.** (घाटकोपरमधील **कुलबांधव अनिलकुमार दत्तात्रय जाईल यांनी हितगुज टपालखर्चापोटी अनाहूतपणे रु. २२१ देणगी** पाठवून या कल्पनेला चालना दिली आहे.)

३. **हितगुजमधील १ पान** (रु. ३००) अगर **प्रतिष्ठान वृत्त, सभासद वृत्त ही सदर** (प्रत्येकी रु. ५००) **प्रायोजित करावी.**

रक्कम 'मराठे प्रतिष्ठान' नांवाने मुंबईतल्या चेकनेच पाठवावी.

**आपले भरघोस सहकार्य मिळेल अशी आशा, नव्हे खात्री वाटते. - संपादक**

***

# सभासद वृत्त

## मानसन्मान

**अनुराधा मराठे यांना
मालती पांडे स्मृति पुरस्कार**

जुलै २००४ मधे सदतिसाव्या बालगंधर्व स्मृतिदिनानिमित्त पुण्यांतील भारत गायन समाजाने आयोजित केलेल्या सोहळ्यात प्रसिद्ध गायिका **सौ. अनुराधा मुकुंद** (पृ.२९७), पुणे, यांना या वर्षीचा कै. मालती पांडे-बर्वे पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. रोख एक हजार रुपये व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. सौ. अनुराधा मराठे यांच्या या गौरवाबद्दल सर्व **कुलबांधवांतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन!**

**पीएचडी वनक्षेत्रपाल**

मागील अंकात 'मानसन्मान' मध्ये 'पीएचडी वनक्षेत्रपाल' या शीर्षकाखाली प्रतिष्ठानचे सभासद चिंतामण चंद्रशेखर (पृ.२४८) असे छापले आहे. ते नांव **चंद्रशेखर चिंतामण (पृ.२४८) असे वाचावे.** चुकीबद्दल क्षमस्व - संपादक

**रामचंद्र कृष्ण यांचा
काव्य मधु-चषक**

मराठे प्रतिष्ठानचे सभासद **रामचंद्र कृष्ण** (पृ.२७) यांनी त्यांच्या आयुष्याच्या आठ दशकांच्या वाटचालीत वेळोवेळी केलेल्या देशभक्तिपर आणि अध्यात्मविषयक कवितांचा संग्रह 'काव्य मधु-चषक' त्यांचे पुत्र विनायक आणि जयंत यांनी नुकताच प्रसिद्ध केला आहे. या पुस्तकाच्या २० प्रती ''मराठे कुळांतील व्यक्तिसमूहात वितरित व्हाव्या'' म्हणून मराठे प्रतिष्ठानकडे पाठवल्या होत्या. १९ जूनच्या कार्यकारी मंडळाच्या सभेत उपस्थित सभासदांना त्यांचे वाटप करण्यात आले. या **कवितासंग्रहाबद्दल रामचंद्र कृष्ण यांचे मराठे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन!**

**सेनादलांतील कमिशन**

**औरंगाबाद येथील सभासद अरुण अच्युत (पृ.४६७) यांचा मुलगा अक्षय** याची भारतीय भूदलातील इंजिनियरिंग शाखेतील कमिशनसाठी निवड झाली आहे. ८ जुलै २००४ रोजी तो भारतीय सेनादल प्रबोधिनी, डेहराडून येथे दाखल झाला. त्याला कर्नल प्रमोदन प्रभाकर मराठे यांच्या कोचिंगचा या निवडीसाठी फारच फायदा झाला. **या निवडीबद्दल अक्षयला मराठे प्रतिष्ठानतर्फे शुभेच्छा!**

**सौरभ सुरेश - सी.ए.**

डोंबिवली येथील सभासद **सुरेश गोविंद (पृ.८७) यांचा मुलगा सौरभ** मे २००४ मधे चार्टर्ड अकौंटंटच्या परीक्षेत यशस्वी झाला. **या यशाबद्दल मराठे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन.**

## नवउद्योजक

मराठे प्रतिष्ठानचे सहकार्यवाह **हेमंत अरुण (पृ.२१) यांनी नुकतीच नवी झेप घेतली** आहे. इलेक्ट्रॉनिक्स साधनांची खरेदी-विक्री व दुरुस्तीसाठी **स्वत:चा व्यवसाय 'मराठे इलेक्ट्रॉनिक्स'** या नांवाने साई निकेतन बिल्डींग, शॉप नं. १२, साईनगर, विरार रोड, नालासोपारा (पूर्व) येथे सुरू केला आहे. ओनिडा, एल.जी, व्हर्लपूल या व अन्य कंपन्यांच्या उत्पादनांच्या खरेदी-विक्री व दुरुस्तीचे व्यवहार ते करीत आहेत. त्यांचा या नव्या व्यवसायांत त्यांना **मराठे कुटुंबियांचे सहकार्य लाभो आणि त्यांच्या व्यवसायाची भरभराट होवो अशी सर्व कुलबांधवांतर्फे शुभेच्छा.** त्यांचा संपर्क फोन २४३३०३८ अगर ९८२२८४७१२०.

## मीननाथ लक्ष्मण यांचे आवाहन

मराठे कुटुंबियांचे स्वेच्छेने यशाशक्ती अर्थसहाय्य लाभावे यासाठीचे मीननाथ लक्ष्मण यांचे आवाहन - ''मी नुकताच एक ट्रस्ट 'मानवमित्र फौंडेशन' या नावाने चॅरिटी कमिशनर यांचेकडे रजिस्टर केला आहे. त्या मार्फत दि. १५ ऑगस्ट २००४ रोजी मुख्यत: ज्यांना आवश्यकता आहे अशांसाठी म्हणून हत्ती-गणपती, शनिपार, भिकारदास मारुती मंदिराजवळ जे लोक जमतात अशा १०० जणांना मिठाई वाटप करण्यात आले. तसेच दि. २९.८.२००४ रोजी 'रिमांड होम शिवाजीनगर, पुणे ५' येथील १२५ मुलांना राखी बांधून, फळ वाटप करण्यात आले. दि. ५.९.२००४ शिक्षकदिनी श्री. गोपाळ बुधकर यांचा गेली अनेक वर्षे अनाथ, गरजू मुलांना पूर्णत: मोफत शिकवणाच्या विशेष कार्यासाठी सत्कार करण्यात आला. असे अनेक प्रसंगोचित कार्यक्रम आम्ही करत राहू. लवकरच रक्तदान शिबीर घेण्यात येणार आहे. पत्ता : **मीनानाथ लक्ष्मण** (पृ.२८०), ४९/७५८, **लोकमान्यनगर, पुण** ४११ ०३०, फोन : २४३३७१८६.''

## नांदा सौख्य भरे

१. पुण्यांतील सभासद **सुधाकर राजाराम (पृ.३६६) यांची मुलगी सीमा** हिचा विवाह ओंकार वसंत धर्माधिकारी यांचेशी २८ जून २००४ रोजी पुण्यात ज्ञानेश मंगल कार्यालयात संपन्न झाला.

२. पुण्यातील सभासद **शशिकांत भास्कर (पृ.४५३) यांची मुलगी वैशाली** हिचा विवाह नितीन मांजरेकर यांचेशी ४ जुलै २००४ रोजी पुण्यात ज्ञानेश मंगल कार्यालयात संपन्न झाला.

३. अंधेरी मुंबई येथील कुलबांधव **कै. प्रभाकर पुरुषोत्तम (पृ.२९२) यांचा मुलगा मंगेश** याचा विवाह भारताच्या महिला क्रिकेट संघातील खेळाडू दीपा कुलकर्णी हिच्याशी अंधेरी

**२४ ऑगस्ट २००४**

**ती. मातोश्री मंदाकिनी दामोदर**

**यांचा प्रथमवार्षिक स्मृतिदिन**

***त्यानिमित्त पुण्यस्मरण***



**प्रभाकर दामोदर मराठे**

**वडाळा, मुंबई.**

येथे ११ जुलै २००४ रोजी संपन्न झाला.

**सर्व नवविवाहितांचे**
**मराठे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन**

## सहवेदना

१. मराठे प्रतिष्ठानचे **पूर्वकार्यवाह वामन गणेश (पृ.१७), प्रभादेवी, मुंबई** यांचे ७६व्या वर्षी ३०.६.२००३ रोजी मुंबईत निधन झाले. गेली काही वर्षे ते कंपवाताने आजारी होते.

२. मणिनगर, अहमदाबाद येथील सभासद **प्रकाश गणेश विद्वांस (पृ.६४५) यांच्या मातोश्री शारदाबाई** यांचे ५.३.२००४ रोजी ८१व्या वर्षी निधन झाले. तत्पूर्वी नुकताच त्यांचा सहस्रचंद्रदर्शन कार्यक्रम साजरा केला होता. अहमदाबादमधे त्या सामाजिक कार्यात गेली ४० वर्षे सातत्याने सहभाग घेत होत्या. तेथील महिला मंडळांतहि त्यांनी सेक्रेटरी आणि अध्यक्ष म्हणून जबाबदारी घेतली होती.

३. वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग येथील कुलबांधव **सुरेश मनोहर (पृ.४०७)** यांचे २०.५.२००४ रोजी ४४व्या वर्षी निधन झाले. ते मधुमेह व किडनीच्या विकाराने दीर्घकाळ आजारी होते.

४. प्रतिष्ठानच्या **पुण्यांतील क्रियाशील कार्यकर्त्या सभासद श्रीमती प्रमिलाबाई भालचंद्र (पृ.३९०)** यांचे १३.६.२००४ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ८४ वर्षांच्या होत्या.

काँग्रेस पक्षाबरोबरच सेवादल, तसेच अखिल भारतीय स्त्री संघटनेच्याहि त्या सक्रिय कार्यकर्त्या होत्या. हरिजन वस्तीतहि त्यांनी समाजसुधारणेचे मोलाचे काम केले होते. १९५२ मधे दिल्ली येथे झालेल्या ऑल इंडिया शूटिंग स्पर्धेत त्यांना प्रथम पारितोषिक मिळाले होते. विविध क्रीडा संघटना, तसेच होमगार्ड संघटनेशीहि त्यांचा संबंध होता.

प्रतिष्ठानच्या पुण्यांतील वधू-वर सूचक मंडळाचा प्रारंभ कै. प्रमिलाबाईंनी केला. अनेक वर्षे निरपेक्ष बुद्धीने त्यांनी हे काम केले. वयोमानानुसार जमेनासे झाल्यावर ही जबाबदारी त्यांनी मोठ्या विश्वासाने सौ. नीलांबरी मराठे यांचेकडे सोपवली.

**वरील सर्व मृतांच्या कुटुंबीयांच्या दु:खात मराठे परिवार सहभागी आहे.**

***

# समुपदेशन केंद्र उपक्रमाचा आराखडा

**- सौ. मंगला प्रवीण** (पृ.३६१), गोरेगांव, मुंबई

(प्रतिष्ठानचे अध्यक्ष अरविंदराव मराठे यांनी १९८७ मध्ये (हितगुज अंक ९) मराठे कुळातील जाणत्या मंडळींची एक 'कौटंबिक सल्ला समिती असावी अशी सूचना केली होती. जून २००२ मध्ये हितगुजच्या सुवर्ण महोत्सवी अंकांत ही सूचना पुनर्मुद्रित करण्यात आली. याला प्रतिसाद म्हणून गोरेगांव येथील सौ. मंगला प्रवीण यांनी असा उपक्रम उपयुक्त होईल अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. या अनुषंगाने 'समुपदेशन - कुटुंब स्वास्थ्य टिकवण्याचा प्रभावी उपाय' हा त्यांचा लेख डिसेंबर २००२ च्या हितगुजमध्ये प्रसिद्ध करण्यांत आला. त्यानंतर 'विवाहपूर्व मार्गदर्शन' (मार्च २००३) आणि 'वृद्धांसाठी डे केअर सेंटर्स' (जून २००४) हे त्यांचे लेख हितगुजमध्ये प्रसिद्ध झाले.

१३ मार्च २००४ च्या कार्यकारी मंडळाच्या सभेत खास निमंत्रित म्हणून त्यांना बोलावण्यात आले. त्यावेळी ठरल्यानुसार **गावोगावी कौटुंबिक सल्ला देण्यासाठी मराठे प्रतिष्ठानची समुपदेशन केंद्रे स्थापन करण्याबाबतचा हा आराखडा** त्यांनी सर्व सभासदांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी पाठवली आहे. - **संपादक**)

प्रतिष्ठानची समुपदेशन केंद्रे विभागवार असावी. (सुरवातीला प्रायोगिक तत्वावर एखादेच सुरू करावे.)

**केंद्रासाठी जागा** - शक्यतो स्टेशन जवळ असावी. एखादा ट्रस्ट, जिमखाना, वाचनालय अशा ठिकाणी जागा बघावी. (किंवा एखाद्या सभासदाचे तळमजल्यावर व मोठे घर असेल तर त्या ठिकाणी चालू शकेल.)

**केंद्राची वेळ** - सुरवातीला १५ दिवसातून एकदा चालवावे.

**केंद्राचे कार्यक्षेत्र** -

➢ मराठे परिवारातील कोणतीही व्यक्ती, त्याचबरोबर तिचे जवळचे नातेवाईक (उदा. बहीण, वहिनी, भाऊ इ.) ह्या सेवेचा लाभ घेऊ शकतील.

➢ ह्या केंद्रात फक्त प्राथमिक सल्ला देण्याचे काम करावे.

- समस्याग्रस्त व्यक्तीचे म्हणणे ऐकून घेणे
- समस्येशी संबंधित व्यक्तींशी बोलणे
- समस्या नेमकी कशामुळे उद्‌भवली ती कारणे समजावून सांगणे
- समस्या निवारणाचे उपाय सुचविणे.

➢ अधिक मदतीची गरज भासल्यास ती मदत कुठे मिळेल याबाबत मार्गदर्शन करावे. अशी मदत म्हणजे पूर्णवेळ सल्लाकेंद्र, मानसशास्त्रज्ञ, मानसोपचारतज्ञ, वकील, पोलिस इत्यादींची असू शकते.

**कार्यकर्ते** - प्रतिष्ठानच्या परिवारातील ज्या व्यक्तींना या केंद्रात समुपदेशनाचे काम करण्याची इच्छा असेल अशा **कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षणाची सोय करावी लागेल. हे प्रशिक्षण म्हणजे या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तीचे व्याख्यान असेल किंवा एक दिवसीय कार्यशाला** असेल. प्रत्येक कार्यकर्त्याने प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. कारण समुपदेशन हे एक तंत्र आहे. केवळ आयुष्याचा अनुभव तिथे पुरेसा पडत नाही.

**सभासदांकडून अपेक्षा** - या उपक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी नावे नोंदवावी. त्यांच्या संख्येनुसार प्रशिक्षण आयोजित करता येईल. ज्यांना शक्य असेल त्यांनी जागा मिळविण्याचा प्रयत्न करावा.

ज्यांना उपक्रमात **सहभागी होण्याची इच्छा आहे किंवा उपक्रमासंबंधी काही सूचना करावयाच्या आहेत त्या सर्वांनी मराठे प्रतिष्ठानच्या पत्त्यावर ३० सप्टेंबर २००४ पर्यंत लिहावे.** ***

# मराठे प्रतिष्ठान

(सार्वजनिक विश्वस्त नोंदणी क्र. ७९१८(मुं.) दि.१२.१.८१)

मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
दूरध्वनी : ४३० २४५३; फॅक्स : ९१-२२-४३७ ९८६३.

## २२ वा वार्षिक अहवाल व हिशेब पत्रके

(१ एप्रिल २००३ ते ३१ मार्च २००४)

## •वार्षिक सर्वसाधारण सभा•

रविवार दि. १० ऑक्टोबर २००४ सकाळी ९.३० वा.

### ❖सभास्थान❖

अ.भा.कीर्तन संस्था सभागृह, डी.एल. वैद्य रोड, दुसरा मजला,
कॉसमॉस बँकेजवळ, दादर प. मुंबई ४०००२८

### •विश्वस्त मंडळ•

| | | | दूरध्वनी | वास्तव्य |
|---|---|---|---|---|
| १. | श्री.अरविंद दामोदर मराठे | अध्यक्ष | ९५२५१ २४७ ०६७७ | डोंबिवली-पू. |
| २. | श्री.आनंद यशवंत मराठे | विश्वस्त | २ ५४२ ५५२४ | ठाणे-प. |
| ३. | डॉ.राजेंद्र विठ्ठल मराठे | विश्वस्त | २ ५४२ १८९१ | ठाणे-प. |
| ४. | श्री.सतीश काशिनाथ मराठे | विश्वस्त | २ ४४५ ८६४६ | दादर-प.,मुंबई |
| ५. | श्रीम. सुलभा सुरेश मराठे | विश्वस्त | २ ४४४ ३०७४ | दादर-प.,मुंबई |

### • कार्यकारी मंडळ •

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | श्री.अरविंद दामोदर मराठे | अध्यक्ष | ९५२५१ २४७ ०६७७ | डोंबिवली-पू. |
| २. | श्री.विनायक केशव मराठे | कार्यवाह | २ ४४४ ३३२९ | वरळी, मुंबई. |
| ३. | श्री.हेमंत अरुण मराठे | सहकार्यवाह | ९५२५० २४३ ३०३८ | नालासोपारा. |
| ४. | श्री.सीताराम गोपाळ खांबेटे | कोषाध्यक्ष | २ ६८३ ६९९४ | अंधेरी-पूर्व,मुंबई. |
| ५. | श्री.अरुण दत्तात्रय मराठे (पुणे) | सभासद | ९५२०२ ४४७ ३२८१ | पुणे. |
| ६. | श्री.लक्ष्मण शंकर मराठे | सभासद | २ ५६८ ०१०४ | मुलुंड-पूर्व,मुंबई |
| ७. | श्री.प्रमोद कृष्ण मराठे | सभासद | २ ५४७ ००५६ | (द्वारा.डॉ.गावंड,)ठाणे. |
| ८. | श्री.हेमंत महादेव मराठे | सभासद | २ ६१७ ७७५७ | विलेपार्ले-पूर्व, मुंबई |
| ९. | श्री.यशवंत सुरेश मराठे | सभासद | २ ४४४ ९२७४ | माहिम, मुंबई. |
| १० | श्री.चिंतामण महादेव मराठे | सभासद | २ ४१५ ५३९० | परळ,मुंबई. |
| ११ | श्री.मोहन सदाशिव मराठे | सभासद | २ ६४६ ४३५१ | बांद्रा-प., मुंबई. |
| १२ | श्री.प्रभाकर दामोदर मराठे | सभासद | २ ४१५ ०८८९ | वडाळा, मुंबई. |
| १३ | श्री.रमाकांत माधव विद्वांस | निमंत्रित | २ ४३० ५२६० | माहीम, मुंबई. |
| १४ | श्री.वामन गणेश मराठे | निमंत्रित | २ ८२६ ९४०२ | जोगेश्वरी-पू. मुंबई. |

### बँकर्स

सारस्वत बँक, प्रभादेवी,मुंबई
यूको बँक, टिळक रोड,पुणे

### लेखा-परीक्षक

चंद्रकांत वामन मराठे, सनदी लेखापाल
ठाणे

# मराठे प्रतिष्ठान

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

मराठे प्रतिष्ठानची बाविसावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.१० ऑक्टोबर २००४ रोजी सकाळी ९.३० वा. अ.भा.कीर्तन संस्था सभागृह, डी.एल. वैद्य रोड, दुसरा मजला, कॉसमॉस बँकेजवळ, दादर प. मुंबई ४०००२८ येथे आयोजिली आहे. सभेनंतर २००३-२००४ या शैक्षणिक वर्षाच्या गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांसाठी पारितोषिक वितरणसमारंभ होईल. तरी सर्व सभासदांनी अगत्यपूर्वक उपस्थित राहावे ही विनंती.

सभेपुढील कामे

१) दि.७ डिसेंबर २००३ रोजी झालेल्या एकविसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून मंजूर करणे.
२) दि.३१ मार्च २००४ रोजी संपलेल्या वर्षाचा कार्यकारी मंडळाचा अहवाल, ताळेबंद व जमाखर्च संमत करणे.
३) सन २००३-२००४ साठी हिशेब तपासनीसांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन निश्चित करणे.
४) मराठे प्रतिष्ठानच्या "घटना व नियमावली"मध्ये सभेच्या संमतीने बदल करणे.(स्पष्टीकरण व तपशील सोबत जोडला आहे)
५) सन २००४-०५ ते २००६-०७ या कालावधीसाठी मराठे प्रतिष्ठानच्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांची निवड करणे.
६) सभासदांकडून आलेल्या पत्रांवर, प्रस्तावांवर तसेच प्रतिष्ठानच्या भावी कार्यक्रमांवर विचार विनिमय करणे.
७) अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या कामांचा विचार करणे.

कार्यकारी मंडळाच्या आदेशावरून
विनायक केशव मराठे
कार्यवाह

२८ सप्टेंबर २००४

### टीपा

*१) गणसंख्येच्या अभावी ही सभा तहकूब झाल्यास ती पुन्हा याच दिवशी सकाळी १०वा.त्याच ठिकाणी भरेल आणि या सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही.*
*२) वार्षिक अहवाल व हिशेब पत्रके सोबत दिली आहेत.त्याबद्दल काही खुलासा हवा असल्यास सभेच्या दिवसा अगोदर समक्ष किंवा पत्राने विचारावा.*
*३) प्रतिष्ठानच्या कार्याबद्दल काही प्रस्ताव, ठराव किंवा सूचना करावयाच्या असल्यास सभासदांनी त्या सभेच्या दिवसाअगोदर कार्यालयात पाठवाव्यात.*
*४) मराठे प्रतिष्ठानच्या कार्यकारी मंडळाची तीन वर्षाची मुदत या सभेच्या दिवशी संपते.या मंडळावर सदस्य म्हणून काम करण्याची इच्छा असलेल्या सभासदांनी सभेअगोदर पत्र पाठवून आपली इच्छा कळवावी. (अर्जाचा नमुना पृ. १२ वर पहा)*
*५) सभेला येताना या अहवालाची प्रत सोबत आणावी.*
*६) सभेनंतर होणाऱ्या पारितोषिक व प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमासाठी संबंधित सर्व गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना वेगळ्या पत्राने निमंत्रणे पाठविली आहेत. किमान मुंबई- ठाणे परिसरातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या पालक सदस्यांसह प्रत्यक्ष उपस्थित राहून आपापले पारितोषिक व प्रमाणपत्र स्वतः घेऊन जावे ही आग्रहाची विनंती*
*७) सभेनंतर अल्पोपाहाराची व्यवस्था केली आहे*

---

<u>वरील विषय क्र.४ बाबत टिपण</u>

<u>घटना व नियमावली</u>

| विद्यमान तरतूद | प्रस्तावित बदलः |
|---|---|
| नियम ६ आ)मराठे प्रतिष्ठानच्या सभासदांचे खालील वर्ग असतील | नियम ६ आ)मराठे प्रतिष्ठानच्या सभासदांचे खालील वर्ग असतील |
| १) उपकारकर्ताः रु. ५,००० किंवा अधिक एकरकमी देणारे | १) उपकारकर्ताः रु. ५,००० किंवा अधिकं एकरकमी देणारे |
| २) आश्रयदाताः रु. १,००० किंवा अधिक एकरकमी देणारे | २) आश्रयदाताः रु. १,००० किंवा अधिक एकरकमी देणारे |
| ३) हितचिंतकः रु. ५०० किंवा अधिक एकरकमी देणारे | ३) हितचिंतकः रु. ५०० किंवा अधिक एकरकमी देणारे |
| ४) आजीवः रु. १००-किंवा अधिक एकरकमी किंवा चार समान व लागोपाठच्या मासिक हप्त्यात देणारे<br>*स्पष्टीकरणः रुपयाची किंमत खूपच घसरल्याने आणि रु.१०० सहज एकरकमी देण्यासारखे असल्यामुळे सदर बदल सुचविला आहे.* | ४) आजीवः रु. १०० किंवा अधिक एकरकमी देणारे |
| ५)वार्षिक वर्गणीदारः रु.१२-प्रतिष्ठानच्या आर्थिक वर्षामध्ये देणारे | ५)वार्षिक वर्गणीदारः रद्द करण्यात यावे. |
| ६)सन्माननीय : कार्यकारी मंडळाच्या ठरावाने स्वीकृत झालेल्या परिवारातील आदरणीय व्यक्ती | ६)सन्माननीय : कार्यकारी मंडळाच्या ठरावाने स्वीकृत झालेल्या परिवारातील आदरणीय व्यक्ती |
| नियम ७) कार्यकारी मंडळः<br>मराठे प्रतिष्ठानचे कामकाज सांभाळण्यासाठी प्रतिष्ठानची वार्षिक सभा अकरा पर्यंत सदस्यांची निवड करील. निवडलेले असे सदस्य व प्रत्येक अधिकृत शाखेचा प्रत्येकी एक प्रतिनिधी यांचे कार्यकारी मंडळ त्यांच्या सदस्यांतून कार्याध्यक्ष,कार्योपाध्यक्ष,कार्यवाह आणि कोषाध्यक्ष यांची निवड करील. कार्यकारी मंडळाची मुदत तीन वर्षाची राहील.<br>*स्पष्टीकरणः प्रतिष्ठानचे उपक्रम अधिक जोमाने राबविले जावेत आणि कार्याचा प्रसार अधिक प्रमाणात व्हावा या हेतूने सदर बदल सुचविला आहे.* | नियम ७) कार्यकारी मंडळः<br>मराठे प्रतिष्ठानचे कामकाज सांभाळण्यासाठी प्रतिष्ठानची वार्षिक सभा पंधरा पर्यंत (त्यापैकी किमान एक महिला सदस्य ) सदस्यांची निवड करील. निवडलेले असे सदस्य व प्रत्येक अधिकृत शाखेचा प्रत्येकी एक प्रतिनिधी यांचे कार्यकारी मंडळ त्यांच्या सदस्यांतून कार्याध्यक्ष, कार्योपाध्यक्ष, कार्यवाह ,सहकार्यवाह आणि कोषाध्यक्ष यांची निवड करील. कार्यकारी मंडळाची मुदत तीन वर्षाची राहील. |
| नियम २०.इ) संकीर्ण<br>किरकोळ खर्चासाठी रोख रक्कम म्हणून कार्यवाह रु.दोनशे पर्यंत रक्कम स्वतः जवळ ठेवू शकतील व त्यातून केलेल्या खर्चास कार्यकारी मंडळाच्या पुढील सभेत संमती मिळवितील.<br>*स्पष्टीकरणः व्यावहारिक सोयीसाठी व आकस्मिक रोख देव-घेव करणे सुकर व्हावे म्हणून हा बदल सुचविला आहे.* | नियम २०.इ) संकीर्ण<br>किरकोळ खर्चासाठी रोख रक्कम म्हणून कोषाध्यक्ष रु.दोन हजार पर्यंत रक्कम स्वतः जवळ ठेवू शकतील व त्यातून केलेल्या खर्चास कार्यकारी मंडळाच्या पुढील सभेत संमती मिळवितील. |

# मराठे प्रतिष्ठान

बाविसावा वार्षिक अहवाल व हिशेब पत्रके
(१ एप्रिल २००३ ते ३१ मार्च २००४)

सभासद बंधू भगिनीनो,

मराठे प्रतिष्ठानच्या दि. ३१ मार्च २००४ रोजी संपलेल्या वर्षाचा म्हणजेच बाविसावा वार्षिक अहवाल कार्यकारी मंडळ सादर करीत आहे.

सभासद

वृत्तांतसाली आजीव सदस्य संख्या (१२५३) ४८ ने वाढून १३०१ झाली (पैकी ११५१ हयात आहेत). आश्रयदाता संख्या (१५) १ ने वाढून १६ झाली (पैकी १५ हयात आहेत). हितचिंतक संख्या (७) व सन्माननीय सदस्य संख्या (४) कायम राहिली. शिवाय हितगुज तहहयात वर्गणीदार संख्या (९३६) ५४ ने वाढून ९९० पर्यंत पोहोचली(पैकी ८६८ हयात आहेत)

वार्षिक सर्वसाधारण सभा

प्रतिष्ठानची एकविसावी वार्षिक सर्वसाधारण सभा दि. ७ डिसेंबर २००३ रोजी सकाळी ९.३० वा. चंद्रशेखर सभागृह, विजयनगर सोसायटी, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी पूर्व, मुंबई ४०००६९ येथे भरली होती. प्रतिष्ठानचे विश्वस्त-अध्यक्ष श्री. अरविंद दामोदर मराठे यांनी सर्वानुमते सभेचे अध्यक्षपद भूषविले.सभासदांची उपस्थिती (५७) समाधानकारक होती.

सभासदानी सभेमध्ये माहिती मिळविण्याच्या दृष्टीने विचारणा केली. प्रतिष्ठानच्या विविध निधींमध्ये भर पडणे आवश्यक आहे असे मत काही सभासदानी व्यक्त केले.दिवसेंदिवस व्याजाचे दर कमी होत आहेत. तेव्हा निधीमध्ये भर घालणे हाच एक मार्ग आपल्याला अनुसरता येईल असा विचार सभासदानी व्यक्त केला. वैद्यकीय मदत निधीमध्ये भरघोस वाढ करण्याची आवश्यकता आहे हे ध्यानात घेऊन प्रतिष्ठानचे विश्वस्त-अध्यक्ष श्री. अरविंदराव मराठे यांनी सभासदांनी हा निधी वाढविण्याचे कामी सढळ हाताने सहकार्य करावे असे आवाहन केले. विशेष म्हणजे स्वतः अध्यक्ष महाशयानी आपली देणगी जाहीर करून सुरुवात करताच प्रतिसाद म्हणून अन्य काही सदस्यानीही उत्स्फूर्तपणे देणग्या घोषित केल्या.

वृत्तांतसाली मराठे परिवारांतील काही व्यक्तींचा सन्मान त्यांच्या विविध पदांवर नेमणुका होऊन वा पारितोषिके देऊन करण्यात आला. प्रतिष्ठानचे एक विश्वस्त डॉ. राजेंद्र विठ्ठल मराठे (ठाणे) यांची ओ.एन. जी.सी.चे जनरल मॅनेजर म्हणून नेमणूक झाली . तर दुसरे विश्वस्त श्री.सतीश काशिनाथ मराठे (दादर) यांची युनायटेड वेस्टर्न बँकेचे अध्यक्ष व कार्यकारी संचालक म्हणून नियुक्ती झाली. शिवाय तिसरे विश्वस्त व विद्यमान अध्यक्ष श्री. अरविंद दामोदर मराठे यांची डोंबिवली नागरिक सहकारी बँकेवर अध्यक्ष व कार्यकारी संचालक पदावर नियुक्ती झाली. तसेच प्रतिष्ठानचे भूतपूर्व विश्वस्त डोंबिवलीचे सुप्रसिद्ध उद्योजक श्री. मधुकरराव चक्रदेव यांचा गणेशमंदिरातर्फे सेवाव्रती म्हणून सत्कार करण्यात आला.

सराफी व्यवसाय करणारे श्री. अजित (अभय) शंकर मराठे यानी आपल्या व्यवसायाची कक्षा साता समुद्रा पलीकडे विस्तारित केली आहे. ठाणे येथील ते पहिले सराफी निर्यातदार असून मंबईत भरलेल्या ज्वेलरी प्रदर्शनात त्यांच्या स्टॉलला प्रथम पारितोषिक मिळाले. कु. श्रिया गोविंद विद्वांस (ठाणे) हिने कराड येथे भरलेल्या राज्यस्तरीय ॲथलेटिक स्पर्धेत तसेच इतर राज्यस्तरीय स्पर्धेतही पारितोषिके मिळविली. श्री. प्रभाकर गणेश मराठे (पुणे) याना राष्ट्रपति डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या उपस्थितीत बंगलोर येथे लाईफटाईम अचीव्हमेंट ॲवार्ड देण्यात आले. श्री.अभिजित प्रभाकर फडणीस (मुलुंड) यांची ठाणे जनता सहकारी बँकेवर तज्ज्ञ संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली. प्रतिष्ठनच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य श्री.हेमंत महादेव मराठे यांचा मुलगा सुशांत याची दुसऱ्या जुनियर वर्ल्ड कप क्रिकेट टीममध्ये संभाव्य २५ खेळाडूंमध्ये प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आली. डोंबिवली येथील कु.ऋचा मिलिंद (श्री.मा.ना.मराठे यांची नात) हिने आंतर विद्यापीठ बास्केट बॉल स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले.

वृत्तांतसाली प्रतिष्ठानच्या संदर्भात (१) डिसेंबर २००३ चे सातवे अखिल भारतीय अधिवेशन, पुणे व (२) नोव्हेंबर २००३ चे गोमंतकीय मराठे परिवार संमेलन, ढवळी-गोवा हे दोन महत्त्वपूर्ण मेळावे भरविण्यात आले.

२१-२२-२३ डिसेंबर २००३ चे पुणे येथे ज्ञानेश मंगल कार्यालयात भरलेले ७ वे अधिवेशन अत्यंत यशस्वी रीत्या पार पडले.तीन दिवस भरगच्च कार्यक्रम होते. त्यात करमणुकीचे कार्यक्रम होतेच. पण प्रबोधन करणारे यशस्वी बांधवांचे कौतुक, सन्मान करणारे होते. आणि विशेष म्हणजे अधिवेशनाच्या ठिकाणी ज्या उद्योजक बांधवांनी स्टॉल्स उभे केले होते त्याना व इतर उद्योजकाना एकत्र घेऊन एक छोटीशी बैठक घेण्यात आली व उद्योग प्रेरणाा उपक्रमाची वाटचाल सुकर होण्याच्या दिशेने प्रयत्न करण्यात आला. तसेच संमेलनाला आवर्जून हजर राहिलेल्या सुमारे ३० माहेरवाशिणींची पारंपरिक रितीने खणा नारळाने ओटी भरून यथोचित सन्मान करण्यात आला.

२२-२३ नोव्हेंबर २००३ चे ढवळी-गोवा येथील श्रीवामनेश्वर देवस्थान सभागृहात भरलेले दुसरे गोमंतक मराठे परिवार संमेलन अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडले. यामध्ये लहान मुलांपासून वयस्क बांधवांपर्यंत सर्वानी भाग घेतला. विशेष गोष्ट म्हणजे मुद्दाम आमंत्रित केलेल्या प्रमुख पाहुण्या डॉ. सौ. वसुधा भिडे यांनी चित्पावनी बोलीविषयी अत्यंत माहितीपूर्ण व्याख्यान दिले.आपल्या भाषणात वसुधाताईनी या बोलीभाषेतील काही गाणी म्हणून दाखविली. आपण चित्पावन म्हणून घेतो पण आपल्या चित्पावनी मायबोलीला मात्र विसरलो ही खंत बऱ्याच बांधवाना वाटली. पूर्वजांविषयी आदर म्हणून आपण चित्पावनी बोलीला पुनर्जीवन देऊ शकणार नाही का ? हा प्रश्न आपण स्वतःलाच विचारून पहावा.

गुणवत्ता पारितोषिके:

वार्षिक सभे नंतर झालेल्या पारितोषिक वितरण समारंभात सन २००२-२००३ वर्षाच्या परीक्षांसाठी शिक्षण निधीतून व अन्य योजना अंतर्गत खालील प्रमाणे ३८ विद्यार्थ्यांना गुणवत्ता पारितोषिके देण्यात आली.

| | | | |
|---|---|---|---|
| १)माध्यमिक शालांत परीक्षा | १४ | पारितोषिके - रु. | ४,१०० |
| २)उच्च माध्य. शा. परीक्षा | ८ | पारितोषिके - रु. | २,३५० |
| ३)पदविका/पदवी/उच्चपदवी | ६ | पारितोषिके - रु. | २,५५० |
| ४)अन्य स्पर्धा /परीक्षा | २ | पारितोषिके - रु. | ३०० |
| | २९ | एकूण - रु. | ९,३०० |

( अधिक तपशील हितगुजच्या डिसेंबर २००३ मध्ये दिला आहे.)

याशिवाय आपापल्या परीक्षेमध्ये मराठे परिवारात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या खालील विद्यार्थ्याना कै.कु.अनिता खांबेटे स्मृति योजने अंतर्गत विशेष पारितोषिके देण्यात आली.

१)कु.सुकृत विनायक खांबेटे(पृ.६९४) विलेपार्ले-दहावी;
२)कु.हर्षद प्रसाद आठवले(पृ.८७) बोरिवली-बारावी;
३)कु.कौस्तुभ अनंत मराठे(पृ ३८०) घाटकोपर इ.चौथी शिष्यवृत्ती;व
४)कु. प्रीता संजय करमरकर,(पृ. ५२०) बदलापूर,इ.सातवी शिष्यवृत्ती याना प्रत्येकी रु.२५०-(एकूण रु.१०००) देण्यात आले.

शैक्षणिक मदत

शिक्षणाविषयी प्रतिष्ठान वरील प्रमाणे पारितोषिके व गरजूंना शैक्षणिक मदत देत असते.आपल्या परिवारातील तरुणाना शिक्षण पुरे करण्याकरिता आर्थिक मदतीची जरूरी भासत असेल तर विनासंकोच त्यांनी प्रतिष्ठानकडे आपली अडचण सांगावी. आम्हाला शक्य होईल ती मदत करूच पण इतर मार्गानी मार्गदर्शन सुद्धा करू.

शिक्षण निधी

अहवाल सालीया निधीमध्ये देणग्या रु.९,८५७ व व्याज रु. २५,७३३ ची भर पडली. गुणवत्ता पारितोषिकांसाठी रु. ९,३०० वजा जाता सालअखेर रु.३,१२,२१० शिल्लक आहेत.(गतसाली रु.२,८५,९२०). शिक्षणनिधीला समाधानकारक प्रतिसाद मिळत आहे. तो सतत असाच वृद्धिंगत होईल असा विश्वास वाटतो.

कै. विनय खांबेटे स्मृति योजना

या योजनेतून इंजिनियरिंगच्या उच्च शिक्षणासाठी बिनव्याजी कर्ज दिले जाते. या योजनेअंतर्गत अहवालसाल अखेर रु. २८,१६५ उपलब्ध आहेत (गतसाली रु.२५,८३९) त्यामुळे नवीन कर्जाऊ शिष्यवृत्तीचा विचार करता येईल.

हितगुज

हितगुज आपल्या भेटीला न चुकता येतो. सुख दुःखाच्या दोनगोष्टी बोलतो. कधीकधी भावणारी कथा सांगतो. पण हा आपला परम मित्र हा उपक्रम कसा काय सांभाळतो याकडे आपण पाहणे आवश्यक आहे.कागदाचे, मुद्रणाचे व टपालाचे दर वेगाने वाढत आहेत. या गोष्टींचा आपण गांभीर्याने विचार करून जाहिरातीच्या द्वारे तसेच हितगुज निधीला देणग्या देऊन व अन्य मार्गाने प्रतिष्ठानला मदत करावी ही विनंती. हितगुजच्या स्वयंपूर्ण योजनेची मार्च १९९४ (अंक १७) मध्ये घोषणा केल्यापासून आजपर्यंतच्या १० वर्षात वर्गणीदार संखा १००० पर्यंत वाढविण्यात व अधिकाधिक परिवारांशी संपर्क स्थापित करण्यात आपण यशस्वी झालो आहोत.

हितगुजनिधी

अहवाल साली या निधीमध्ये देणग्या रु. ४,३७८ तहहयात वर्गणी रु.१०,८००, व्याज रु.२३,८२७ व जाहिराती रु.१,५०० मिळून रु.४०,५०५ ची वाढ झाली व हितगुज प्रकाशनखर्च रु.३२,४२५.५५ वजा जाता रु.२,७२,८२६.३५ साल अखेर शिल्लक आहेत.(गतसाली रु.२,६४,७४६.९०)

वैद्यकीय मदत निधी

या निधीमध्ये देणग्या रु. ८,५०१ व व्याज रु.१८६५ ची वाढ होऊन अहवालसाल अखेर रु.२६,०८३ शिल्लक आहेत. (गतसाली रु. २०,४१७). या निधीसाठी कुलबांधवांनी देणग्या दिल्यास त्याचा लाभ गरजू बांधवाना मिळवून देता येईल.अहवालसाली परळ येथील श्री विनायक महादेव मराठे यांच्या मातोश्री पार्वतीबाई यांना पायावरील शस्त्रक्रियेसाठी रु. ५,००० ची वैद्यकीय मदत देण्यात आली. वैद्यकीय मदती संदर्भात प्रतिष्ठानकडे आलेल्या अर्जांचा सहानुभूतीपूर्वक विचार केला जातो.ज्या सभासदाना शक्य असेल त्यानी वैद्यकीय मदत निधीमध्ये भर घालावी.

उद्योग प्रेरणाः

हा उपक्रम अजूनही जोर पकडत नाही. सभासदानी, विशेषतः तरुणवर्गाने प्रतिष्ठानला त्यांच्या सूचना वा अपेक्षा जरूर कळवाव्या.

उद्योग प्रवर्तन निधी

या निधीमध्ये देणग्या रु.१,००० व व्याज रु.३,०४२ ची भर पडून अहवालसाल अखेर रु.३७,८४०शिल्लक आहेत (गतसाली रु. ३३,७९८)

कुलवृत्तांत निधी

या निधीमध्ये देणग्या रु. १,००१ व व्याज रु.४२५ ची भर पडून अहवालसाल अखेर रु.६,१४५-शिल्लक आहेत (गतसाली रु. ४,७१९) आपला कुलवृत्तांत अद्ययावत करण्याचा आमचा प्रयत्न आहे.आपल्या कुटुंबातील फेरबदल आपण वेळोवेळी कळवावेत . म्हणजे तशी नोंद घेता येईल.

कै.सुरेशभाऊ स्मृतिनिधीः

अहवालसाली या निधीमध्ये व्याज रु.५,१४३- ची वाढ होऊन सालअखेर रु.६२,२८९- शिल्लक आहेत.(गतसाली रु.५७,१४६)

शाखा कार्य- पुणे शाखाः

पुणे शाखेचे काम अत्यंत समाधानकारक रितीने चालू आहे. या शाखेत तरुणांचा सहभाग लक्षणीय आहे. प्रतिष्ठानचा वर्धापन-दिन पुणे शाखेकडून नियमितपणे २६ जानेवारीला उत्साहात साजरा केला जातो. अहवालसाल या उत्सवाचे रजत महोत्सवी वर्ष म्हणून पुणे शाखेने डिसेंबर २००३ मध्ये अखिल भारतीय अधिवेशन घेतले त्याचा वर उल्लेख आला आहे. शिवाय सविस्तर वृत्तांत हितगुजच्या मार्च व जून २००४ अंकामध्ये आला आहेच. पुणे शाखेने वधुवर शाखा कार्य उत्तमपणे चालविले आहे. हितगुजच्या प्रत्येक अंकामध्ये वधुवर सहाय्य या सदरात विवाहयोग्य वधुवरांची माहिती देण्यात येते.

याखेरीज सांगली, मिरज, नागपूर, गोवा व पुणे येथील बांधव छोटे छोटे मेळावे घेऊन विचार-विनीमय करतात, गप्पागोष्टी मारतात. लहान सहान कार्यक्रम करतात. असे कार्यक्रम, मेळावे जागोजाग भरले पाहिजेत. निमित्त काहीही असो, हेतू एकच असावा की परिवार भावना कशी वाढीस लागेल. राजकीय पाठिंबा नाही, सामाजिक पाया ढासळलेला, एवढेच काय पण भाऊबहिणी सुद्धा या जीवघेण्या धांदलीत दुरावत आहेत. हा प्रवाह आपण थांबविला पाहिजे.कुटुंबाचा विस्तार मराठे परिवारापर्यंत नेऊन आपण या अनाकलनीय विजनवासातून आपली सुटका करून घेतली पाहिजे. या अहवालानिमित प्रतिष्ठानचे कार्यकारी मंडळ मराठे परिवारातील समस्त बंधू भागिनीना अत्यंत कळकळीचे आवाहन करीत आहे की आपण विचाराने व शक्य तेथे प्रत्यक्षपणे एकत्र आल्याशिवाय तरणोपाय नाही. संघौ शक्तिः कलौ युगे.

श्रद्धांजली

अहवालसाली ज्या व्यक्तींचे दुःखद निधन झाले त्यांची नावे हितगुजच्या अंकामधून वेळोवेळी प्रसिद्ध केली जातात. या सर्व ज्ञात व अज्ञात मृत व्यक्तींच्या परिवार-सदस्यांचे दुःखामध्ये प्रतिष्ठान सहभागी आहे.

ऋणनिर्देश

प्रतिष्ठानच्या कार्यात ज्या सभासदानी व त्यांच्या कुटुंबियांनी वेळात वेळ काढून सर्व कामे बाजूला सारून, प्रसंगी कौटुंबिक दुःख विसरून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष हातभार लावला तसेच ज्या सभासदानी प्रतिष्ठानच्या विविध उपसमित्यांवर निरपेक्षपणे काम केले त्या सर्वांचे कार्यकारी मंडळ अत्यंत ऋणी आहे.

अरविंद दा. मराठे
अध्यक्ष

# मराठे प्रतिष्ठान

## आयव्यय पत्रक २००३-२००४

| ३१-३-०३ | व्यय (खर्च) | ३१-३-०४ | ३१-३-०४ |
|---|---|---|---|
| ८१०.०० | लेखा परीक्षण फी | ८१०.०० | |
| ०.०० | धर्मादाय आयुक्त फी | २,६५७.०० | ३,४६७.०० |
| | मुंबई(मुख्य कार्यालय)खर्च | | |
| ५००.०० | अनिता खांबेटे स्मृ.पा. | १,०००.०० | |
| १,२९५.०० | वाषिक सभा खर्च | ७,२४०.०० | |
| ७३.१० | बँक चार्जेस (मुं.) | २०.०० | |
| १००.०० | हिंदी पारितोषिक | ०.०० | |
| १,२१०.०० | किरकोळ खर्च(मुं.) | ६४०.०० | |
| ३,२८९.०० | छपाई व स्टेशनरी | ४,७०२.०० | |
| ३,५७८.०० | टपाल व वितरण (मुं.) | ५,५५८.०० | |
| १०,४००.०० | गुणवत्ता पारितोषिके | ९,३००.०० | |
| १,०००.०० | वैदिक शिक्षण पारितोषिक | ०.०० | |
| ०.०० | वैद्यकीय मदत | ५,०००.०० | ३३,४६०.०० |
| ०.०० | पुणे संमेलन खर्च(तूट) | १९,४५९.७५ | १९,४५९.७५ |
| | पुणे शाखा खर्च | | |
| ३,१९५.०० | वर्धापन दिन खर्च | ०.०० | |
| | बँक चार्जेस (पु.) | ४१५.०० | |
| ७३.०० | टपाल व वितरण (पु.) | ६०.०० | ७७५.०० |
| | हितगुज प्रकाशन खर्च | | |
| ३४,४३३.०० | हितगुज छपाई | १९,४७०.०० | |
| १६,१६२.५० | हितगुज पोस्टेज | ११,३६६.०५ | |
| ६८८.०० | हितगुज टेलिफोन | ८९४.५० | |
| १,१६३.०० | हितगुज प्रवास | ६९५.०० | ३२,४२५.५५ |
| | उत्पन्न व खर्च | | |
| २९,९१०.७८ | खर्चापेक्षा ज्यादा उत्पन्न | ०.०० | ०.०० |
| १०८,०४०.३८ | एकूण | ८९,५८७.३० | ८९,५८७.३० |

| ३१-३-०३ | आय (जमा) | ३१-३-०४ | ३१-३-०४ |
|---|---|---|---|
| | जमा व्याज | | |
| | अ)मुदत ठेवींवरील व्याज | | |
| | (विविध निधी /योजनांचा | | |
| ३९,७०९.८८ | हिस्सा वर्ग करून ) | २७,८०८.१७ | |
| | ब)बचत खात्यांवरील व्याज | | |
| १,३३७.०० | सारस्वत बँक, वरळी | १,८८१.०० | |
| ३०.०० | युकोबँक , पुणे | १३०.०० | २९,८१९.१७ |
| | वार्षिकसभा. देणग्या | | |
| | सी. गो. खांबेटे | २,०००.०० | |
| | वा.ग. मराठे | २,०००.०० | ४,०००.०० |
| | विविध निधींतून वर्ग | | |
| १०,४००.०० | शिक्षण निधी | ९,३००.०० | |
| ५००.०० | अनिता खांबेटे स्मृति यो | १,०००.०० | |
| १००.०० | हिंदी पारितोषिक योजना | ०.०० | |
| १,०००.०० | वैदिक शिक्षण योजना | ०.०० | |
| ०.०० | वैद्यकीय मदत निधी | ५,०००.०० | १५,३००.०० |
| | पुणे शाखा जमा | | |
| २,३१७.०० | वर्धा.खर्चासाठी देणग्या | ०.०० | |
| २००.०० | किरकोळ जमा-वधुवर.(पु.) | १७०.०० | १७०.०० |
| | हितगुज प्रकाशन जमा | | |
| १२,२०१.०० | हितगुज जाहिराती | १,५००.०० | |
| ४०,२४५.५० | हितगुज निधीतून वर्ग | ३०,९२५.५५ | ३२,४२५.५५ |
| | उत्पन्न व खर्च | | |
| ०.०० | उत्पन्नापेक्षा ज्यादा खर्च | ७,८७२.५८ | ७८७२.५८ |
| १०८,०४०.३८ | एकूण | ८९,५८७.३० | ८९,५८७.३० |

चंद्रकांत वामन मराठे
सनदी लेखापाल
मुंबई , २८-८-२००४

कृते मराठे प्रतिष्ठान

| अरविंद दा.मराठे | सी गो खांबेटे | विनायक के. मराठे |
|---|---|---|
| अध्यक्ष | कोषाध्यक्ष | कार्यवाह |

या अहवालातील हिशेब पत्रके व परिशिष्टांमध्ये स्थलसंकोचामुळेअपरिहार्य असल्यास अथवा मांडणीच्या सोयीनुसार संक्षिप्त पदे वापरली आहेत त्यांचा खुलासा अकारविल्हेनुसार येणेप्रमाणे:

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| आसक्र. | आजीव सदस्य क्रमांक | दे. | देणगी | वैद्य. | वैद्यकीय (मदत) |
| आसशु. | आजीव सदस्य शुल्क | पावती.क्र. | पावती क्रमांक | संमे. | संमेलन (पुणे २००३) |
| आश्रशु. | आश्रयदाता सदस्य शुल्क | (पु.) | पुणे शाखा | संमे.शु. | संमेलन (पुणे २००३) शुल्क |
| उ. व ख. | उत्पन्न व खर्च | (मुं.) | मुंबई मुख्य कार्यालय | स्वाग. | स्वागतिका |
| उ.पेक्षा ख. | उत्पन्नापेक्षा खर्च (जास्त) | यो. | योजना | स्मृ. | स्मृति |
| कुपृ. | कुलवृत्तांत पृष्ठ क्रमांक | वर्धा. | वर्धापन दिन | स्मृ.पा. | स्मृति पारितोषिके |
| ख.पेक्षा उ. | खर्चापेक्षा उत्पन्न (जास्त) | वधुवर. | वधुवर शाखा (पुणे) | स्मृ.यो. | स्मृति योजना |
| जाहि. | जाहिरात | वार्षिकसभा. | वार्षिकसभाखर्चासाठी(देणग्या) | हिवक्र. | हितगुज वर्गणीदार क्रमांक |
| तह.वर्गणी | तहहयात वर्गणी(हितगुज) | वि.खां.स्मृ.यो. | विनय खांबेटेस्मृति योजना | हि.व. | हितगुज वर्गणी |

# मराठे प्रतिष्ठान

ताळेबंद ३१-३-०४

| ३१-३-०३ | निधी व देणी | ३१-३-०४ | ३१-३-०४ |
|---|---|---|---|
| | विविध निधी व योजना | | |
| १५१,७९५.०० | कायम निधी | १५६,५९५.०० | |
| १,०००.०० | अधिक : देणग्या | ०.०० | |
| २,८००.०० | अधिक :आसशु(मुं.) | ३,३००.०० | |
| १,०००.०० | अधिक:आसशु(पु.) | १,५००.०० | |
| ०.०० | अधिक:आश्रशु(मुं.) | १,०००.०० | १६२,३९५.०० |
| ४,२९०.०० | कुलवृत्तांत निधी | ४,७१९.०० | |
| ०.०० | अधिक : देणग्या (मुं.) | १,००१.०० | |
| ४२९.०० | अधिक : व्याज | ४२५.०० | ६,१४५.०० |
| २६१,२६३.०० | शिक्षण निधी | २८५,९२०.०० | |
| ८,९३१.०० | अधिक: देणग्या (मुं.) | ३,७५४.०० | |
| ०.०० | अधिक: देणग्या( पु.) | ६,१०३.०० | |
| २६,१२६.०० | अधिक: व्याज | २५,७३३.०० | |
| -१०,४००.०० | वजा:उत्पन्नवखर्चाकडे | -९,३००.०० | ३१२,२१०.०० |
| ५१,९५१.०० | सुरेशभाऊस्मृ.निधी | ५७,१४६.०० | |
| ५,१९५.०० | अधिक: व्याज | ५,१४३.०० | ६२,२८९.०० |
| १२,५४४.०० | उद्योग प्रवर्तन निधी | ३३,७९८.०० | २०,०००.०० |
| | अधिक: देणग्या(मुं.) | १,०००.०० | |
| १,२५४.०० | अधिक: व्याज | ३,०४२.०० | ३७,८४०.०० |
| ९०,३६६.७५ | विशिष्ट हेतु निधी | ९९,४०३.७५ | |
| ९,०३७.०० | अधिक: व्याज | ८,९४६.०० | १०८,३४९.७५ |
| १८,८३४.०० | वैद्य. मदत निधी | २०,७१७.०० | |
| | अधिक:देणग्या(मुं.) | ४,०००.०० | |
| | अधिक:देणग्या(पु.) | ४,५०१.०० | |
| १,८८३.०० | अधिक: व्याज | १,८६५.०० | |
| ०.०० | वजा:उत्पन्नव खर्चाकडे | -५,०००.०० | २६,०८३.०० |
| ०.०० | युवा मंच निधी | ०.०० | |
| | अधिक: देणग्या(पु.) | १,००१.०० | १,००१.०० |
| २६९,४९२.४० | हितगुज निधी | २६४,७४६.९० | |
| २,७५१.०० | अधिक:देणग्या(मुं.) | २,३७७.०० | |
| | अधिक:देणग्या( पु.) | २,००१.०० | |
| ४,४००.०० | अधिक:तह.वर्गणी(मुं.) | ७,२००.०० | |
| १,४००.०० | अधिक:तह.वर्गणी(पु.) | ३,६००.०० | |
| ६,९४९.०० | अधिक:व्याज | २३,८२७.०० | |
| -४०,२४५.५० | वजा:उ. व ख.कडे | -३०,९२५.५५ | २७२,८२६.३५ |
| ०.०० | पुणे संमेलन निधी | ०.०० | |
| | अधिक:संमे.शु (पु) | ४७,३२०.०० | |
| | अधिक:संमे.शु (मुं.) | १,६००.०० | |
| | अधिक:संमे.दे. (पु) | २५,१५४.०० | |
| | अधिक:स्वाग.जा. (पु) | ४५,९००.०० | |
| | अधिक:स्वाग.जा.(मुं) | ५,०००.०० | |
| | | १२४,९७४.०० | |
| | वजा: संमे.खर्च | -१४४,४३३.७५ | |
| | तूट | -१९,४५९.७५ | |
| | उ. व खर्चाकडे | १९,४५९.७५ | ०.०० |
| ९२३,०४५.६५ | | ९८९,१३९.१० | ९८९,१३९.१० |

| ३१-३-०३ | मालमत्ता व येणी | ३१-३-०४ | ३१-३-०४ |
|---|---|---|---|
| | गुतवणूक | | |
| | मुदत ठेवी | | |
| २६०,२९३.०० | सारस्वत बँक,वरळी | ३२५,२९३.०० | |
| १६५,०००.०० | कॉसमॉस बँक,दादर | १६५,०००.०० | |
| १८२,५४२.०० | जनता बँक(पुणे)दादर | १८२,५४२.०० | |
| २२०,४६१.३५ | जनकल्याण बँक,शीव | २२४,३२७.८० | |
| ७५,०००.०० | जनकल्याण बँक,दादर | ७५,०००.०० | |
| ११०,०००.०० | जनकल्याण बँक,शि. | ११०,०००.०० | |
| ५९,०००.०० | यु.टी.आय. | ५९,०००.०० | |
| ३३,८२८.०० | युकोबँक, पुणे | ३५,१७४.०० | ११७६,३३६.८० |
| | येणे व्याज | | |
| ०.०० | जनकल्याण बँक, शीव | ७,९११.२५ | |
| ५,७६५.६३ | जनकल्याण बँक,दादर | ०.०० | |
| १,७८४.०० | जनता बँक(पुणे),दादर | ०.०० | |
| ०.०० | युकोबँक , पुणे | १,२३०.०० | ९,१४१.२५ |
| | आयकर (टीडीएस) | | |
| २,२६२.०० | १९९८-९९ | २,२६२.०० | |
| ४,९६८.०० | १९९९-०० | ४,९६८.०० | |
| २,१८८.०० | २०००-०१ | २,१८८.०० | |
| २,२९६.०० | २००१-०२ | २,२९६.०० | |
| २,००२.०० | २००२-०३ | २,००२.०० | |
| ०.०० | २००३-०४ | ६९६.०० | १४,४१२.०० |
| | बँकेतील शिल्लक व रोख | | |
| | बँक | | |
| ५२,७८०.७० | सारस्वत बँक, वरळी | १९,७७७.२५ | |
| २,६२४.०० | युको बँक,पुणे | २५,६६६.०० | ४५,४४३.२५ |
| | रोख | | |
| ११७.०० | रोख (मुं.) | २८२.०० | |
| १,९३०.०० | रोख (पु. | १,९५५.२५ | २,२३७.२५ |
| | कर्जाऊ शिष्यवृत्ती (वि.खां.स्मृ.यो.तून) | | |
| १०,०००.०० | तेजस शिरीष मराठे | १०,०००.०० | |
| १०,०००.०० | रविंद्र रामचंद्र खांबेटे | १०,०००.०० | २०,०००.०० |
| १२०४,८४१.६८ | | १२६७,५७०.५५ | १२६७,५७०.५५ |

| ३१-३-०३ | निधी व देणी | ३१-३-०४ | ३१-३-०४ |
|---|---|---|---|
| १२३.०४५.६५ | | ९८९,१३९.१० | ९८९,१३९.१० |
| ४१,६७२.०० | विनयखांबेटेस्मृयो | ४५,८३९.०० | |
| ४,९६७.०० | अधिकः व्याज | २,३२६.०० | ४८,१६५.०० |
| १२,०२८.०० | अनिताखांबेटेस्मृयो | १२,७३१.०० | |
| १,२०३.०० | अधिकः व्याज | १,१४६.०० | |
| -५००.०० | वजाःउ. व ख.कडे | -१,०००.०० | १२,८७७.०० |
| ६,४६५.०० | गणेश तां.शि.पा.यो. | ७,१११.०० | |
| ६४६.०० | अधिक : व्याज | ६४०.०० | ७,७५१.०० |
| १,०६४.०० | हिंदी पारि.योजना | १,०७०.०० | |
| १०६.०० | अधिकः व्याज | ९६.०० | |
| -१००.०० | वजाःउ. व ख. कडे | ०.०० | १,१६६.०० |
| १४,०४९.०० | वैदिक शिक्षण यो. | १४,४५४.०० | |
| १,४०५.०० | अधिक : व्याज | १,३०१.०० | |
| -१,०००.०० | वजाःउ. व ख.कडे | ०.०० | १५,७५५.०० |
| २,००१.०० | शौर्य पारितो.योजना | २,००१.०० | |
| | अधिक : व्याज | १८०.०० | २,१८१.०० |
| | तरतुदी | | |
| १,५९८.०० | लेखा परीक्षण फी | ८१०.०० | |
| २,४२५.०० | धर्मादाय आयुक्त फी | ५०८२.०० | |
| २,०५०.०० | गुणवत्ता पारितोषिके | ०.०० | ५,८९२.०० |
| १६२,५२६.२५ | उत्पन्न व खर्च | १९२,५१७.०३ | |
| २९,९९०.७८ | अधिकःख.पेक्षा जमा जास्त | ०.०० | |
| ०.०० | वजाःजमेपेक्षा खर्च जास्त | -७८७२.५८ | १८७,३०१.४५ |
| १२०४८४१.६८ | एकूण | १२६७५७०.५५ | १२६७५७०.५५ |

| ३१-३-०३ | मालमत्ता व येणी | ३१-३-०४ | ३१-३-०४ |
|---|---|---|---|
| १२०४८४१.६८ | एकूण | १२६७५७०.५५ | १२६७,५७०.५५ |
| १२०४८४१.६८ | एकूण | १२६७५७०.५५ | १२६७,५७०.५५ |

मुंबई २८-८-२००४ — चंद्रकांत वामन .मराठे, सनदी लेखापाल

अरविंद दा.मराठे, अध्यक्ष — सी गो खांबेटे, कोषाध्यक्ष — विनायक के. मराठे, कार्यवाह

2003-04 सालातील नवीन आजीव सदस्य व हितगुज वर्गणीदारांकडून प्राप्त रकमाः परिशिष्ट अ

मराठे प्रतिष्ठान मुंबई कार्यालया कडे

| पावती क्र. | कु पृ | आडनाव | नाव | निवास | हि व | हिवक्र | आशु | आसक्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MP0839 | 217 | मराठे | अमित अरुण | सांगली | 200 | 937 | 100 | 3265 |
| MP0840 | 537 | मराठे | हनुमंत मोरेश्वर | बोरिवली | 200 | 938 | 100 | 3266 |
| MP0842 | 82 | मराठे | श्रीपाद जनार्दन | भोपाळ | 200 | 939 | 100 | 3267 |
| MP0843 | 277 | मराठे | अजित वामन | ठाणे | 200 | 940 | 100 | 3268 |
| MP0844 | 82 | मराठे | काशिनाथ विष्णू | ठाणे | 200 | 941 | 100 | 3269 |
| MP0848 | 63 | मराठे | चिंतामणि शंकर | डोंबिवली | 200 | 944 | 100 | 3270 |
| MP0849 | 374 | मराठे | विनायक दत्तात्रेय | उसगाव | 200 | 945 | 100 | 3271 |
| MP0853 | 693 | खांबेटे | प्रमोद त्र्यंबक | मुलुंड | 200 | 946 | 100 | 3272 |
| MP0862 | 622 | बोराडकर | निर्मला रघुनाथ | पुणे | 200 | 955 | 100 | 3280 |
| MP0865 | 100 | मराठे | चंद्रकांत वामन | ठाणे | 200 | 956 | 100 | 3281 |
| MP0866 | 449 | मराठे | श्रीप्रसाद रमाकांत | मळेवाड | 200 | 957 | 100 | 3282 |
| MP0867 | 467 | मराठे | आनंद अच्युत | चिंचवड | 200 | 958 | 100 | 3283 |
| MP0869 | 347 | मराठे | माधव रघुनाथ | पिलीभीत | 200 | 959 | 100 | 3284 |
| MP0870 | 865 | खांबेटे | नरेंद्र केशव | पुणे | 200 | 960 | 100 | 3285 |
| MP0871 | 96 | मराठे | सुधा लक्ष्मण | भोपाळ | 200 | 961 | 100 | 3286 |
| MP0872 | 513 | मराठे | अमर दिनकर | पुणे | 200 | 962 | 100 | 3287 |
| MP0873 | 364 | गोगटे | नलिनी लक्ष्मण | चेन्नई | 200 | 963 | 100 | 3288 |
| MP0874 | 364 | प्रकाश | शारदा नारायण | पुणे | 200 | 964 | 100 | 3289 |
| MP0876 | 624 | विद्वांस | भालचंद्र मोरेश्वर | तळेगाव | 200 | 965 | 100 | 3290 |
| MP0877 | 497 | मराठे | भालचंद्र परशुराम | तुळस | 200 | 966 | 100 | 3291 |
| MP0878 | 91 | केळकर | अर्चना काशिनाथ | देवगड | 200 | 967 | 100 | 3292 |
| MP0879 | 114 | मराठे | प्रकाश बाळकृष्ण | दहिबाव | 200 | 968 | 100 | 3293 |

**विशेष सूचना**

१ ) हितगुज तहहयात वर्गणीदार झाले असूनही आजीव सदस्य वर्गणी पाठविली नसल्यास त्या सदस्याच्या नावापुढे बाकी असे शब्द किंवा ( ?) असे प्रश्नचिह्न अथवा (०) शून्य दर्शविले असल्यास आजीव सदस्य वर्गणी( रु. १००)त्वरित पाठवून द्यावी

२) कुपृ.(कुलवृत्तांत पृष्ठ) स्थंभा ाध्ये ?. ०, किंवा रिकामा असल्यास सदर सदस्याची मराठे परिवारातील संबंधाची माहिती अपूर्ण आहे. कृपया आपल्या वडिलांचे पूर्ण नाव व माहित असल्यास घराणे क्रमांक कळविणे.

| पावती क्र. | कु पृ | आडनाव | नाव | निवास | हि व | हि वक्र | आशु | आसक्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MP0881 | 438 | मराठे | पाडुरंग लक्ष्मण | कणकवली | 200 | 953 | 100 | 3294 |
| MP0882 | 439 | मराठे | सुरेश नारायण | हरकुळ | 200 | 970 | 100 | 3295 |
| MP0883 | 437 | मराठे | विजय विष्णू | कणकवली | 200 | 971 | 100 | 3296 |
| MP0884 | 437 | मराठे | मंदार शरच्चंद्र | कणकवली | 200 | 989 | 100 | 3297 |
| MP0886 | 558 | मराठे | सतीश मधुकर | डेरवण | 200 | 985 | 100 | 3298 |
| MP0888 | 318 | डोंगरे | सुरेखा सतीश | ठाणे | 200 | 981 | 100 | 3299 |
| MP0892 | 722 | चक्रदेव | गजानन त्र्यंबक | पुणे | 200 | 983 | 100 | 3301 |
| MP0897 | 695 | खांबेटे | विजय प्रभाकर | बंगलोर | 200 | 990 | 100 | 3311 |
| MP0846 | 285 | सोवनी | आशा | पुणे | 200 | 942 | 0 | |
| MP0847 | 285 | आठवले | वर्षा | पुणे | 200 | 943 | 0 | |
| MP0861 | 548 | मराठे | सदाशिव वामन | गोवा | 200 | 954 | बाकी | 0 |
| MP0880 | 117 | मराठे | वसंत रावजी | खुडीपाट | 200 | 969 | | 2475 |
| MP0889 | 468 | मराठे | कमलाकर भास्कर | चेंबूर | 200 | 984 | | 2616 |
| MP0894 | 322 | मराठे | माधव वामन | डोंबिवली | 200 | 982 | | 2340 |
| MP0839 | 217 | मराठे | संध्या अरुण | सांगली | | | 100 | 3264 |
| MP0858 | 32 | मराठे | रविंद्र दिनकर | विरार | | | 100 | 3279 |
| MP0889 | 468 | मराठे | शकुंतला कमलाकर | चेंबूर | | | 100 | 3300 |
| MP0860 | 624 | विद्वांस | अखिल जयंत | अमेरिका | | | 1,000 | 1217 |
